# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

## प्रेस नोट दि.१३/०७/२०१९

## <u>दि.१२/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २७५/१९,भादविक ३९२,३४१,३४ |
| **फिर्यादी** | शुभम मल्हाडे,वय-२४ वर्षे,रा.न-हे,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०७/२०१९ रोजी २३/०० ते २३/३० वा.चे दरम्यान मॅजेस्टीक हॉलचे समोर चांदणी चौकाकडे जाणा-या रोडवर नवीन ओव्हर ब्रीजचेवर वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र अमोल मुंडे याचेसह मोटार सायकलवरुन जात असताना नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना काय बघतोय रे असे बोलुन, फिर्यादी व त्यांचे मित्रास चाकुचा धाक दाखवुन,मारहाण करुन,फिर्यादी यांचेकडील १४,०००/- रु किमतीचा मोबाईल, ३००/- रुपये रोख रक्कम तसेच १५,०००/-रु किची मोटार सायकल हि जबरदस्तीने काढुन घेवुन चोरी करुन निघुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.डी.येवले ८८८८८०२२५२ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४८६/१९,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | चिन्मल पार्डीकर,वय-२१,रा.न-हेगांव,पुणे |
| **आरोपी** | १.सुनिल बाबु मरगळे,वय-१९,रा.मुळशी,जि.पुणे (अटक) व दोन विधीसंघर्षीत बालक (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०७/२०१९ रोजी ०१/१५ ते ०१/४० वा.चे दरम्यान नवले पुल सर्व्हिस रोड,बिस्लरी चौक,वडगाव-बुदुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मोटार सायकलवरुन जात असताना,यातील नमुद इसम व विधीसंघर्षीत बालक यांनी संगनमत करुन,फिर्यादीस आडवुन त्यांचे नाव व पत्ता विचारुन त्यांना गाडीवरुन खाली ओढुन जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचे पॅन्टच्या खिशातील ७००/- रु काढुन घेत असताना,फिर्यादी यांनी प्रतीकार केला असता,त्यांनी त्यांचे मनगटावर चाकुने वार करुन त्यांना जखमी करुन,त्यांचेजवळील ७००/- रूपये रोख रक्कम व मोटार सायकल नं.एमएच-२६/एयु/१७८८ असा एकुण ४०,७००/- रु किचा ऐवज जबरी चोरी करुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शिवदास गायकवाड ९८२३७११७१८ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे १३५/१९,भादविक १४३,१४४,१४७,१४९,३२४,३२३,५०६,महा.पो.का.क. ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | रुस्तम पाखरे,वय-२८ वर्षे,रा.मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०७/२०१९ रोजी ०१/३० वा.सुहास भडकुंबे यांचे घरा समोर असणा-या जांभळाच्या झाडाखाली,प्रेमनगर वसाहत,मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद ओळखीचे असुन,फिर्यादी व त्यांचे मित्र शिल प्रक्षळे असे मोटार सायकलवरुन जात असताना,सदर इसामांनी फिर्यादीस आवाज देवुन त्यांना “२००९ साली स्पिकरवरुन झालेल्या भांडणातुन,माझ्या वडीलांना का मारलेस,आता बघच आम्ही काय करतो ते” असे बोलुन गैर-कायदयाची मंडळी जमा करुन,फिर्यादीस शिवीगाळ करून,धमकी देवुन, त्यांना हाताने,बांबुने व कोयत्याने फिर्यादीचे शरिरावर मारहाण करुन,जखमी केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.एस.भोसले ९१३९७७७१११ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १६६/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-८८ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०७/२०१९ रोजी सकाळी ०७/४५ वा. ४३/६२,नवसहयाद्री सोसायटी,कर्वेनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे राहते बंगल्यात येवुन,त्यांचे पत्नीला ते खरवस विक्रेते आहेत असे सांगुन,आम्ही लग्नपत्रिका देणे कामी आलो असुन,आम्हाला लग्नासाठी सोने बनवायचे आहेत असे सांगुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन व अंगठी ७७,५००/- रु किचे डिझाईन बघण्यासाठी घेवुन,फसवणुक करून निघुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.के.गोरे ९९७५०७४०६२ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४०७/१९,भादविक २७९,३३८,मोव्हेॲक्ट १७(१)/१७७ |
| **फिर्यादी** | अब्दुल बडगुजर,वय-२५ वर्ष,रा.पारगेनगर,कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | मोपेडवरील अनोळखी चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०७/२०१९ रोजी सकाळी १०/४५ वा. पुणे-सातारा रोड,स्वामी विवेकानंद पुतळ्या समोर सहकारनगर नं.१,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी रस्ता ओलांडण्यासाठी उभे असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोपेड ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे डावे बाजुने चुकीचे दिशेने येवुन, फिर्यादीचे उजवे पायाला धडक देवून खाली रस्त्यावर पाडुन,त्यांचे उजवे पायाचे पंज्याला फ्रॅक्चर करून,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. खराडे ९८२३०५८७७७ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २८४/१९,भादविक २७९,३३८,मोव्हेॲक्ट १३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | हितेश प्रभाकर,वय-३४ वर्षे,रा.मुंजाबा वस्ती रोड,धानोरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात दुचाकी वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/७/२०१९ रोजी २३/३० ते २४/०० वा.चे दरम्यान ई-ऑन आय.टी. सर्कल जवळ येवले चहाचे समोर सार्वजनिक रोडवर,खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व जखमी अभिजित राजेंद्र मुंगीकर हे एकाच कंपनीत नोकरीस असुन,ते हॉटेल मध्ये जेवण करुन,त्यांचे कारमधुन ईऑन आयटी सर्कल जवळील येवले चहाचे समोर येवुन कार थांबवुन,अभिजित हे खाली उतरुन रस्ता क्रॉस करुन पान आणण्यासाठी जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी अभिजित यास जबर ठोस मारून,त्यास गंभीर जखमी करुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. शेख ९८२३७२४५८५ |

## दि.१३/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे १३६/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | रोहित कणसे, पो.शि.मार्केटयार्ड पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात ट्रक चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०७/२०१९ रोजी २१/३५ वा. गंगाधाम चौक मार्केटयार्ड,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार विनोद धोंडीराम लडकत,वय-३८,रा.सनं.६१८/१,३,मार्केटयार्ड,पुणे याचे चेह-यावरून व पोटाचे भागावरून ट्रकचे मागील डबर एक्सल चाक घालुन,त्यांना गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. (मयत इसम विनोद धोंडीराम लडकत यांनी डोक्यावर हेल्मेट घातले नव्हते.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.ए.खटके ९५५२७२१७२१ |
| **२** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३६५/१९,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | यमुनाबाई मुंडलीक,वय-६० वर्ष,रा.काळेपडळ,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एक इसम,वय-४५ वर्ष,रा.काळेपडळ,हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०७/२०१९ रोजी पहाटे ०१/४५ वा. काळेपडळ रेल्वे गेट जवळ,रेल्वे पटरीवर,हडपसर, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा कृष्णा ऊर्फ किसन प्रल्हाद मुंडलीक,वय-२६ वर्ष,रा.सदर यांने यातील नमुद इसमाचे मुलीशी लग्न केल्याचे कारणावरून,सदर इसमाने फिर्यादी यांना धमकावुन कृष्णा यास त्रास देऊन,काळेपडळ रेल्वेगेट हडपसर येथे रेल्वे पटरीवर आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. हेमचंद्र खोपडे ९९२३१०७३२३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**